02 DEC 2021
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीएच.डी.ची प्रवेश प्रक्रिया आता ऑटोमेशन प्रणालीद्वारे!

## या वर्षीपासून अंमलबजावणी; अर्जापासून डिग्रीपर्यंत सर्वकाही ऑनलाईन

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी.च्या जुन्या नियमामध्ये या वर्षापासून बदल केला असून, अर्जापासून डिग्रीपर्यंतची सर्व प्रक्रिया आता ऑटोमेशनद्वारे होणार आहे. यामुळे विद्यार्थी आणि गाईड यांना ॲक्टिव्ह मोडवर राहावे लागणार आहे.

पूर्वी पारंपरिक पद्धतीने पीएच.डी.साठी अर्ज करून तसेच त्याला आवश्यक कागदपत्रे जोडून सादर करताना बराच कालावधी लागत होता. ही सर्व प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक होती. यात अपेक्षित काम होत नसल्याने विद्यार्थ्यांना पीएच.डी.चा संशोधन प्रबंध सादर करण्यास विलंब लागत होता. या सर्व गोष्टींचा विचार करून यात सुधारणा करण्याचा निर्णय



पुढारी विशेष

शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. त्यानुसार यंदापासून ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन म्हणजे ऑटोमेशन प्रणालीद्वारे केली जाणार आहे. सध्या मुंबई, पुणे विद्यापीठांसह इतर ठिकाणी या प्रणालीचा वापर केला जात असल्याचे समजते. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे ७० ते ८० पीएच.डी. रिसर्च सेंटर असून, साधारणपणे २ हजार गाईड आहेत. पीएच.डी. करणाऱ्यांची संख्या ५ हजारांहून अधिक आहे. ऑटोमेशन प्रणालीद्वारे पीएच.डी. ॲडमिशन प्रोसेस, रिझर्व्हेशन कोटा, पोझिशन, कोर्सवर्क तसेच सहा महिन्यांच्या कालावधीनंतर रिपोर्ट तपासणे ही कामे केली जाणार आहेत. नवीन प्रणालीमुळे गाईडचे काम वाढण्याची शक्यता आहे. या प्रणालीत संशोधन प्रबंध सादर करणारा विद्यार्थी, गाईड यांच्यात कायम सुसंवाद राहणार आहे. नवीन प्रणालीमुळे पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. संशोधन प्रबंध सादर केल्यानंतर तो कोणत्या स्टेजला आहे, हे विद्यार्थांना मोबाईलवर समजणार आहे. प्रत्येक गोष्ट ऑनलाईन झाल्याने विद्यार्थ्यांच्या सोयीचे ठरणार आहे. पीएच.डी. संशोधन पूर्ण झाल्यावर ज्या दिवशी मुलाखत होईल, त्याच दिवशी विद्यार्थ्यांना निकाल दिला जाणार आहे.

### कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करता येणार

पूर्वी पीएच.डी.साठी संशोधन प्रबंधाच्या सहा प्रती सादर कराव्या लागत होत्या. नवीन ऑटोमेशन प्रणालीद्वारे सर्व कागदपत्रे यासह विद्यार्थ्यांना लॉगीनमध्ये ऑनलाईन पद्धतीने अपलोड करता येणार आहेत. गाईड व बाहेर असणाऱ्या परीक्षकांना पीएच.डी. संशोधन प्रबंधाची सॉफ्ट कॉपी पाठवली जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या वेळ आणि पैशाची बचत होणार आहे.

“ शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया ऑटोमेशनद्वारे करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांसह गाईड यांना घरबसल्या पीएच.डी.संदर्भातील सर्व माहिती मोबाईलवर समजणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा बहुमूल्य वेळ वाचणार आहे.

**- डॉ. पी. एस. पाटील,** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

02 DEC 2024 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा महाविद्यालय सलग ३७ वर्षे मल्लखांब चषकाचे मानकरी

प्रतिनिधी
वारणानगर

येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावत सलग ३७ व्या वर्षी मल्लखाब चषकाचे मानकरी ठरले.

वारणानगर ता. पन्हाळा येथे वारणा महाविद्यालयाच्या क्रिडागणावर पार पडलेल्या स्पर्धेत एकूण १३ महाविद्यालयानी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये प्रथम क्रमांक यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर, द्वितीय क्रमांक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठ वडगाव, तृतीय क्रमांक शिवराज कॉलेज गडहिंग्लज यांनी मिळवला. वारणा महाविद्यालयाच्या संघामध्ये उदय शिवाजी जाधव,शुभम आप्पासाहेब पाटील,आदित्य वसंत किर्दत,सुरज बाळासो पाटील, रवींद्र बस्ती लाल पाटील, प्रज्वल अशोक पाटील यांचा सहभाग होता. विजयी संघास श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कार्जीनी, डॉ. कल्पना पाटील प्राचार्य डॉ. ए. एम शेख यांचे प्रोत्साहन मिळाले.संघ व्यवस्थापक, महाविद्यालय जिमखाना प्रमुख प्रा. क्रांतीकुमार पाटील, मल्लखांब प्रशिक्षक सुहास कंदूरकर व मार्गदर्शक राष्ट्रीय खेळाडू उदय जाधव, उदय पाटील रोहित घेवारी यांचे मार्गदर्शन मिळाले. स्पर्धा पार पाडणेसाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 DEC 2024
तरुण भारत




वाकरे:दत्त द्वारका महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ पोवार व खेळाडू सर्वसाधारण विजेतेपद स्वीकारताना

# दत्त द्वारका महाविद्यालयाला विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद

**वाकरे :** वाकरे (ता.करवीर) येथील दत्त द्वारका महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेत फ्री स्टाईल या कुस्तीत गुणानुक्रमे २३ गुण तर ग्रीको रोमन कुस्तीत १३ गुण मिळवून दोन्ही क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सर्वसाधारण विजेतेपद मिळविले.जयवंत महाविद्यालय,इचलकरंजी आयोजित व वेकोंबा मैदान येथे स्पर्धा झाल्या. फ्री स्टाईल मध्ये प्रणव पाटील ५७ किलो तृतीय क्रमांक ,अतूल चेचर ६१ किलोमध्ये प्रथम क्रमांक, प्रथमेश चेचर ६५ किलो तृतीय क्रमांक , धैर्यशिल लोंढे ७९ किलो तृतीय क्रमांक , विनायक वास्कर ८६ किलो द्वितीय क्रमांक ,मोहन पाटील ९२ किलो प्रथम क्रमांक , तेजश मोरे १२५ किलो प्रथम क्रमांक तसेच ग्रीको रोमन मध्ये माऊली टिपुगडे ६७ किलो प्रथम क्रमांक , रोहित पाटील ७२ किलो द्वितीय क्रमांक ,ओंकार पाटील ८२ किलो प्रथम क्रमांक पटकावला. या खेळाडूंची कराड येथे होणऱ्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ पोवार, सचिव प्राचार्या रुपाली पोवार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांच्या या निवडीबद्दल महाविद्यालयं व विद्यापीठ परिसरामध्ये त्यांचे कौतुक होत आहे